भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/१२/२०१६

१) काठीने मारून दुखापत केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०३/१२/२०१६ चे १६.०० वा. ते दि. ०४/१२/२०१६ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादीच्या घरच्या गाई म्हशी चारीत असता यातील आरोपी हा फिर्यादी जवळ येवुन तु माझ्या शेतातील धानाचा गठठा गाई म्हशीला चारले म्हणुन भांडण शिवीगाळ करून मारण्यापीटण्याची धमकी देवुन काठीने फिर्यादीचे उजव्या हाताचे मनघटावर व उजव्या पायाचे पोटरीवर मारूण दुखापत करून फॅक्चर झाल्याने फिर्यादी हेमराज मंसाराम बोदनकर वय ६२ वर्ष रा. पोहरा यांचे तोंडी व डॉ.रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४, ५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

२) जमीनीचे पैसे का देत नाही या कारणावरून काठीने मारून दोन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २२/१२/२०१६ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादी श्रावण रामचंद्र फुलबांधे वय ४० वर्ष रा. खोकरला हा आपले पुतन्या सतिश गुलाब फुलबांधे सह आरोपी याचे कडे विकलेल्या जमीनीचे पैसे व ७ आर जागा आम्हाला करारा प्रमाने का परत करत नाही असे बोलले असता यातील आरोपीतांनी संगनमत करून आरोपी क्र. २ ने फिर्यादीच्या डोक्यावर व पुतण्याचे डाव्या हातावर काठीने मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ.रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४, ३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

३) धानाच्या पुजना आग लावुन जाळल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २१/१२/२०१६ चे २३.०० वा. दर. यातील फिर्यादी पंठरी तातोबा बावणे वय ६२ वर्ष रा. मेंढाभुगाव यांचे शेतावर ०.५ एकर शेतामध्ये जवळपास १५ धानाच्या भाऱ्यानी रचलेल्या जयश्रीराम जातीचा धानाचा पुजंना अंदाजे २४,०००–/रू. चा यातील आरोपीने आग लाऊन नुकशान केल्याने व फिर्यादीने आरोपीस विचारणा केली असता आरोपीने फिर्यादीस मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ४३५,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा चोले पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

४) लग्नाचे आमीस देऊन महीलेसी प्रेम संबध प्रस्थापीत करून फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :–

सन २००७ पासुन आज पावेतो यातील फिर्यादी सोबत आरोपीने सन २००७ पासुन प्रेम संबध प्रस्थापीत करून तीला लग्नाचे आमीस देवुन तिच्या सोबत वेगवेगळया ठिकानी प्रेम संबध प्रस्थापीत करून ति महार जातीची असल्याने माहीत असुन सुध्दा तिच्या सोबत शारीरीक संबध ठेऊन तिची फसवणुक केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७६,(२)(एन); ४१७ भादवी. सहकलम ३,(२)(५), अ.जा.ज.अ. प्र.कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधीकारी भंडारा श्री जोगदंड हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) मोटार सायकलची चोरी. :–

दिनांक २१/१२/२०१६ चे १८.००ते २०.०० वा. दर. यातील फिर्यादी कुनाल तुळशिराम चिटघरे वय २४ वर्ष रा. प्लॉट नं. ६६ आर्या नगर कोराडी रोड नागपुर ह.मु. कुहीकर यांचे घरी स्नेहा नगर तकीया वार्ड भंडारा यानी आपले घरासमोर ऊभी ठेवलेली काळसर रंगाची होन्डा साईन क्र.एमएच २० सीव्ही ०९०१ कि. ३०,०००/–रू ची कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी सिंध्दे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत

५) अवैध दारु / जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक २२/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे.जवाहरनगर व साकोली येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दा कि. ५००/–रू. तसेच जुगारातुन कि. ९६६. /–रू. असा एकुण कि. १,४६६/–रू. चा माल जप्त करण्यात आला .

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०११११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.